# राष्ट्रीय आरोग्य अभियान

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर
१५ वा वित आयोग अंतर्गत कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता जाहीरात
सन २०२२-२३

## शुध्दीपत्रक

दि.१६/०६/२०२२ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध १५ वा वित्त आयोग अंतर्गत कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी - MPW (पुरुष) या पदाची जाहीरात प्रकाशित करण्यात आली होती. दि. ०५/०७/२०२२ रोजीच्या मा. सहसंचालक (तांत्रिक) रा.आ.अ. मुंबई यांच्यास्तरावरुन प्राप्त सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार शैक्षणिक अर्हतेमध्ये खालील तक्त्यात नमूदप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

तक्ता-१

| अ.क्र | कार्यक्रमाचे नांव | पदाचे नांव | दि. १६/०६/२०२२ रोजी प्रकाशित जाहीरातीतील नमूद शैक्षणिक अर्हता | शुध्दीपत्रकाव्दारे नव्याने ठरविण्यात आलेली शैक्षणिक अर्हता (राज्यस्तरावरुन प्राप्त निर्देशानुसार) |
|---|---|---|---|---|
| 1 | Urban HWC | MPW- Male (बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी-पुरुष) | HSC Pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course. | १) विज्ञान शाखेतून उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण केलली आहेत, आणि<br>२) विभागाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडून आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निवैद्यकिय मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरक्षिक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

करीता सदर पदाच्या शैक्षणिक अर्हतेत वरील तक्त्यात नमूद नुसार बदल शुध्दीपत्रकाव्दारे समजण्यात यावे.

**नियम व अटी :-**

१) सदर पदाकरीता शुध्दीपत्रकाव्दारे नव्याने ठरविण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हता धारकांनी **दि.२६/०८/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत सदर पदाकरीता नव्याने अर्ज सादर करता येईल.** तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना दि. १६/०६/२०२२ रोजी प्रकाशित जाहीरातील नमूद नियम व अटी लागू असतील.

२) दि. १६/०६/२०२२ च्या प्रसिध्द जाहीरातीनुसार सदर पदाकरीता ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत त्या उमेदवारांनी पुन्हा नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही. त्या उमेदवारांचे जुनेच अर्ज विचारात घेतल्या जातील यादी नोंद घ्यावी.

३) सदर पदाकरीता मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. १५०/- चे बॅक ऑफ महाराष्ट्र बॅंकेचे जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर खाते क्र. **60403391534, IFSC Code – MAHB0001321** वर **RTGS / NEFT / IMPS** व्दारे भरणा करुन पावती फार्म सोबत जोडावे.

४) सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र./१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार अदा करण्यात येईल. (गट क व गट ड वगळता)

५) संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

६) भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद् करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

७) जाहीरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाकरीता नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या विचारात घेवून खालील निकषाप्रमाणे यादी प्रसिध्द करण्यात येईल.

अ) शैक्षणिक अंतिम वर्षाचे गुणांच्या ७०%

ब) पदव्यूत्तर पदवी असल्यास १० गुण व पदव्यूत्तर पदविका असल्यास ५ गुण (उच्च शैक्षणिक अर्हता) अतिरिक्त देण्यात येतील (जास्तीत जास्त १० गुण त्यापेक्षा जास्त नाही) परंतू अ व ब ची एकत्रित बेरीज ७०% पेक्षा जास्त असणार नाही.

क) उमेदवारास शासकिय, निमशासकिय, शासन अंगीकृत संस्था व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रत्येक १ वर्षाकरीता ४ गुण त्यानुसार जास्तीत जास्त २० गुण देण्यात येईल.

ड) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी- (पुरुष) पदासाठी Skill Assessment Protocol या करीता १० गुण असे मिळून एकूण १०० गुण देण्यात येतील.

ई) ज्या पदाकरीता Skill Assessment Protocol लागू नाही अशा पदांकरीता अ,ब व क प्रमाणे एकूण गुणनिश्चिती करण्यात येईल. तसेच Skill Assessment Protocol लागू असलेल्या पदांना Skill Assessment Protocol नुसार गुणनिश्चिती करण्यात येईल.

८) वरील पदांबाबत भरतीप्रक्रिये संबंधीत संपूर्ण अद्यावत माहिती व अद्यावत यादी www.nagpurzp.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

स्वा-
सदस्य सचिव
जि.ए.आ. व कु.क. सो.
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर